तरुण भारत
Apla Nagpur | 2022-07-16 | Page- 6
epaper.tarunbharat.net

# ८७ उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीचे आदेश

◆ **नागपूर, १५ जुलै**

नागपूर जिल्हा परिषदेकडील ८७ उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नियुक्तीचे आदेश आज जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी जारी केले. कै. आबासाहेब खेडकर सभागृहात ही प्रक्रिया पार पडली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) विपल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) प्रमिला जाखलेकर, अधिकारीवर्ग आणि अनुकंपा तत्वावराल नियुक्ती देण्यासाठी बोलाविलेले उमेदवार उपस्थित होते.

एकूण ९४ उमेदवारांची अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी निवड करण्यात आली होती. यापैकी ८७ उमेदवार उपस्थित होते. यावेळी उमेदवारांच्या पसंतीनुसार त्यांना कार्यालय निवडण्याच्या सूचना करण्यात आल्या. त्यानुसार उमेदवारांनी समुदेशन प्रक्रियेद्वारे



नागपूर जि. प. कडील अनुकंपा तत्त्वावरील उमेदवारास नियुक्ती आदेश देताना योगेश कुंभेजकर

जिल्हा परिषदेंतर्गत कार्यालय निवडले.

उमेदवारांनी कार्यालय निवडताच त्याच ठिकाणी त्यांना नियुक्ती आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुंभेजकर यांचे हस्ते प्रदान करण्यात आले.

_अनुकंपा तत्वावर ज्या पदांवर ८७ उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली त्यामध्ये सामान्य प्रशासन विभागांतर्गत वरिष्ठ सहायक - ४, कनिष्ठ सहायक - ११, परिचर - ३५, बांधकाम विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी सहायक - ३, कनिष्ठ अभियंता - २, शिक्षण विभागांतर्गत शिक्षण सेवक - ४, पंचायत विभागांतर्गत ग्रामसेवक - १३, यांत्रिकी विभागाकडील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) - १, वित्त विभागाकडील कनिष्ठ सहायक (लेखा)- ४, वरिष्ठ सहायक लेखा-१, महिला व बाल कल्याण विभागांतर्गत पर्यवेक्षिका -१, आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवक (पुरुष) - ३, औषध निर्माता - १, जलसंधारण विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी सहायक - ३, ग्रामीण पाणी पुरवठा अंतर्गत मदतनीस - १ यांचा समावेश आहे. ◀*(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments

# जिप में अनुकंपाधारक 87 उम्मीदवारों की नियुक्ति

**भास्कर संवाददाता | नागपुर।** जिला परिषद में अनुकंपा नियुक्ति का बरसों से इंतजार कर रहे उम्मीदवारों में सीईओ योगेश कुंभेजकर ने उम्मीद जगाई है। समुपदेशन कर उनकी नियुक्ति की प्रक्रिया आरंभ कर दी। 15 जुलाई को 87 उम्मीदवारों का समुपदेशन कर नियुक्ति आदेश जारी किए। इससे पहले भी नियुक्तियां की जा चुकी है। जिप के आबासाहब खेलकर सभागृह में समुपदेशन प्रक्रिया पूरी हुई। 94 अनुकंपा उम्मीदवारों को समुपदेशन के लिए आमंत्रित किया गया, उनमें से 87 उम्मीदवारों ने उपस्थिति दर्ज की। उन्हें अपनी पसंद से कार्यालय का चयन करने की मोहलत दी गई। उम्मीदवारों ने जिस कार्यालय में सेवा देने की इच्छा जताई, उसी कार्यालय में नियुक्ति आदेश दिए गए।

दैनिक भास्कर
BhaskarHindi.com
Sat, 16 July 2022
https://epaper.bhaskarhindi.com/c/

देशोन्नती

# समुपदेशनाद्वारे ८७ अनुकंपाधारकांची नियुक्ती

## सीईओ कुंभेजकर यांनी दिले आदेश

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नागपूर** ■ जिल्हा परिषदेमध्ये अनुकंपा नियुक्तीचा विषय गत अनेक वर्षांपासून रखडला होता. गेल्या अनेक वर्षांपासून शेकडो उमेदवार नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत. टप्प्याटप्प्याने मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) योगेश कुंभेजकर यांच्याकडून या उमेदवारांची नोकरीची प्रतीक्षा संपुष्टात आणत त्यांना शासन सेवेत सामावून घेतले जात आहे. शुक्रवार १५ जुलै रोजी यात आणखी ८७ उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर समुपदेशन पध्दतीव्दारे नियुक्तीचे आदेश कुंभेजकर यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

जि.प.च्या कै. आबासाहेब खेडकर सभागृहात ही समुपदेशन प्रक्रिया पार पडली. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) विपूल जाधव, डेप्युटी सीईओ (पंचायत) प्रमिला जाखलेकर व इतर विभागप्रमुख यावेळी उपस्थित होते. शुक्रवार १५ जुलैसाठी एकूण ९४ उमेदवारांची अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसाठी निवड करण्यात आली होती. यापैकी ८७ उमेदवार उपस्थित होते. यावेळी त्यांना त्यांच्या पसंतीनुसार कार्यालय निवडण्याच्या सूचना करण्यात आल्यात. त्यानुसार उमेदवारांनी समुपदेशन प्रक्रियेव्दारे जि.प. अंतर्गत कार्यालय निवडले. त्यांनी कार्यालय निवडताच त्यांना त्याच ठिकाणी कुंभेजकर यांच्या हस्ते नियुक्ती आदेशही प्रदान करण्यात आले. शुक्रवारला नियुक्ती देण्यात आलेल्यांमध्ये सामान्य प्रशासन विभागांतर्गत वरिष्ठ सहायक ४, कनिष्ठ सहायक ११, परिचर ३५, बांधकाम विभागाअंतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी सहायक ३, कनिष्ठ अभियंता २, शिक्षण विभागांतर्गत शिक्षण सेवक ४, पंचायत विभागांतर्गत ग्रामसेवक १३, यांत्रिकी विभागातील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) १, वित्त विभाग कनिष्ठ सहायक (लेखा) ४, वरिष्ठ सहायक १, महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत पर्यवेक्षिका १, आरोग्य विभाग आरोग्य सेवक (पुरुष) ३, औषध निर्माता १, जलसंधान विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी सहायक ३, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाअंतर्गत मदतनीस १ अशा ८७ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली. या पदभरती प्रक्रियेमुळे २०१७ अखेरपर्यंतची अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीची यादी पूर्ण झालेली असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. नियुक्तीचा आदेश हाती पडताच अनुकंपा उमेदवारांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव दिसून आले.

पुण्य नगरी

# जि.प.त ८७ अनुकंपाधारकांच्या नोकरीचे स्वप्न पूर्ण

## थेट सभागृहातच दिले नियुक्तिपत्र

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**नागपूर : जिल्हा परिषदेत अनुकंपा नियुक्तीसाठी अनेक वर्षे खस्ता खाव्या लागायच्या तरीही अनुकंपाचा क्रमांक येत नव्हता. परंतु सीईओ योगेश कुंभेजकर यांनी मात्र अनुकंपाधारकांचा अनुशेष पूर्णतः निकाली काढण्याचे शिवधनुष्य उचलले. शुक्रवारला (१५ जुलै) ८७ अनुकंपाधारकांचे समुपदेशन करून थेट नियुक्तिपत्र हातात सोपविले. अनुकंपाचा अनुशेष इतक्या मोठ्या प्रमाणात निकाली काढणारी नागपूर जिल्हा परिषद राज्यात पहिली असल्याचे बोलले जाते.**

जि. प.च्या आबासाहेब खेडकर सभागृहात ही समुपदेशन प्रक्रिया पार पडली. याप्रसंगी अतिरिक्त सीईओ डॉ. कमलकिशोर फुटाणे, डेप्युटी सीईओ सामान्य विपुल जाधव, डेप्युटी सीईओ (पंचायत) प्रमिला जाखलेकर व इतर विभागप्रमुखांची उपस्थिती होती. एकूण ९४ उमेदवारांची अनुकंपातत्त्वावर नियुक्तीसाठी निवड करण्यात आली. यापैकी ८७ उमेदवार उपस्थित होते. त्यांना त्यांच्या पसंतीनुसार कार्यालय निवडण्याच्या सूचना करण्यात आल्यात. त्यानुसार उमेदवारांनी समुपदेशन प्रक्रियेद्वारे जि. प.अंतर्गत कार्यालय निवडले.

कार्यालय निवडताच त्यांना त्याच ठिकाणी कुंभेजकर यांच्या हस्ते नियुक्त आदेश प्रदान करण्यात आले. या नियुक्तीमध्ये सामान्य प्रशासन विभागांतर्गत वरिष्ठ साहाय्यक चार, कनिष्ठ साहाय्यक ११, परिचर ३५, बांधकाम विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी साहाय्यक तीन, कनिष्ठ अभियंता दोन, शिक्षण विभागांतर्गत शिक्षण सेवक चार, पंचायत विभागांतर्गत ग्रामसेवक १३, यांत्रिकी विभागातील कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) एक, वित्त विभाग कनिष्ठ साहाय्यक (लेखा) चार, वरिष्ठ साहाय्यक एक, महिला व बालकल्याण विभागांतर्गत पर्यवेक्षिका एक, आरोग्य विभाग आरोग्यसेवक (पुरुष) तीन, औषधीनिर्माता एक, जलसंधान विभागांतर्गत स्थापत्य अभियांत्रिकी साहाय्यक तीन, ग्रामीण पाणीपुरवठा विभागांतर्गत मदतनीस एक, अशा ८७ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली. या पदभरतीप्रक्रियेमुळे २०१७ अखेरपर्यंतची अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीची यादी पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाची आहे.